**“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद” योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.**

सन २०२६-२७ करिता (लेखाशिर्ष २२१७ ०९१३) अंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जि. ठाणे करिता रक्कम रु.५०.०० कोटी

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः- मनपा-२०२६/प्र.क्र.४५/नवि-१६ (ई-१५८६१९२)**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक:- १३ मे, २०२६**

**संदर्भ :-**

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.:-धोरण-२०१७/प्र.क्र.९६/ नवि-१६, दि.१२ डिसेंबर, २०१७, दि. ३० सप्टेंबर, २०२०, दि. २४ एप्रिल, २०२३ व १६ एप्रिल, २०२६.

(२) नगर विकास, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१५/नवि-१६ (ई- ९३१९२७), दि. २३ एप्रिल, २०२५

(३) नगर विकास, शासन निर्णय क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-४)/नवि-१६, दि. २९ मार्च, २०२५.

(४) नगर विकास, शासन पत्र क्रमांक:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-४)/नवि-१६, दि. ०४ एप्रिल, २०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. संदर्भाधीन क्र.(३) येथील शासन निर्णयाचा निधी संदर्भाधीन क्र.(४) येथील शासन पत्रान्वये आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे वर्ग करण्यात आला असून सदर निधीतून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस निधी मंजूर व वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :-**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जि. ठाणे** करिता **“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद”** या योजनेअंतर्गत **“कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकरीता मंजूर असलेल्या अमृत १.० योजनेअंतर्गत महानगरपालिका स्वहिस्स्यातील पाणी पुरवठा विषयक कामे करणे” रक्कम रु. ५०,००,००,०००/- कोटी (अक्षरी रक्कम रु. पन्नास कोटी मात्र)** इतका निधी सदर कामाकरीता मंजूर व वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

**२.** सदर कामाची कार्यान्वयण यंत्रणा **“महानगरपालिका”** राहील.

**३.** अमृत १.० योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या कामांव्यतिरिक्त इतर कामांवर निधी खर्च करता येणार नाही.

४. शासनाकडून मंजूर केलेल्या निधीचा विनियोग सर्व विहित प्रक्रियांचा अवलंबकरुन व निकषानुसार करण्याची जबाबदारी आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी करुन घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरुक्ती होणार नाही याची दक्षता आयुक्त यांनी घ्यावी.

६. या शासन निर्णयानुसार वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता संदर्भाधीन क्र.(४) येथील शासन पत्रानुसार तत्कालीन परिस्थितीत निधी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे वर्ग करण्यात आले होते. तथापि, प्रशासकीय सोईकरीता या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, ठाणे यांना नियंत्रक अधिकारी, जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई /सहाय्यक आयुक्त (लेखा), नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी या शासन निर्णयामध्ये नमूद केलेला निधी तात्काळ जिल्हाधिकारी, ठाणे/ जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे सुपुर्द करावा. तसेच जिल्हाधिकारी, ठाणे/ जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी सदरचा निधी संबंधित कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

७. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरु करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करुन घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

८. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेकडून उपलब्ध करुन घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

९. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करु नये.

**१०.** सदर निधी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६ जून,२००८ मधील तरतुदीप्रमाणे खर्च करणे बंधनकारक राहील. सदर निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ करिता वितरीत करण्यात येणाऱ्या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

**११.** आहरण व संवितरण अधिकाऱ्याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदर निधी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ मधील तरतुदीप्रमाणे खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

**१२.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

**१३.** सदर निधी कामावर खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

**१४.** संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५१३११४९२०८३२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.05.13 11:50:30 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुध्दे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
६. विभागीय आयुक्त, कोकण
७. जिल्हाधिकारी, ठाणे.
८. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, जि. ठाणे.
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, ठाणे.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१४. अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
१५. जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
१६. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१७. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.